।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

| Phone: (02462) 229242<br>FAX No. (02462) 229574 | website: srtmun.ac.in | e-mail: approvalsrtmun@gmail.com |
|---|---|---|


जावक क्र.शैक्ष/मान्यता/०२/२०१८–१९/ 191 दिनांक : २२ जून, २०१८

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : महाविद्यालयातील घडयाळी तासिका तत्वावर सहाय्यक प्राध्यापकांच्या नेमणूकी संदर्भात...

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, संलग्नीत महाविद्यालयात मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांनी शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ वर्षाकरीता प्रदान केलेल्या नाहरकत प्रमाणपत्राप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपातील घडयाळी तासीका तत्वावरील नियुक्ती करण्यात येतात. सदर पदावर **उमेदवाराची निवड करताना नेट/सेट/पीएच.डी. धारक उमेदवार उपस्थित असल्यास महाविद्यालयांनी नेट/सेट/पीएच.डी. धारक उमेदवारास निवड करणे आवश्यक आहे.** पात्रताधारक उमेदवार उपस्थीत असतांना अपात्र उमेदवारांची निवड केल्यास विद्यापीठ व शासनाकडून याबाबत कारवाई केली जावू शकते, याची दक्षता घ्यावी. तसेच या करीता गुणदान करतांना यु.जी.सी. विनियम—२०१० प्रमाणे सहाय्यक प्राध्यापक पदाच्या निवडी करीता विहित केलेल्या प्रपत्राचा वापर आवश्यक बद्दल करून करावा. सदर प्रपत्र, **उमेदवाराच्या स्वाक्षरीसह असलेले उपस्थिती पत्रकावर प्राचार्यांनी साक्षांकित करून अन्य आवश्यक कागदपत्रासह विद्यापीठाकडे लवकरात लवकर पाठवावेत.**

घडयाळी तासीका तत्वावरील नियुक्ती ही महाविद्यालयीन स्तरावर तात्पुरत्या कालावधीकरीता असल्यामुळे पूर्वीच्या नियुक्त्यांची प्रकरणे विद्यापीठाकडे पाठवू नयेत. अशा प्रस्तावाची कोणतीही दखल घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:

१) कुलसचिव, विशेष कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.
२) जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परीपत्रकास वृत्तपत्रातून प्रसिध्दी दयावी.
३) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर पत्र विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.
४) निवड नस्ती.